**प्रेस नोट** **दिनांक २६/०३/२०१९**

## खडक पोलीस ठाणे,पुणे शहर

## फडगेट बीट मार्शलवरील कर्मचारी यांना पेट्रोलींग दरम्यान सापडलेल्या कॅरीबॅगमधील महत्वाची कागदपत्रे मुळ मालकाचा शोध घेवून परत.

दि.२४/०३/२०१९ रोजी दिवसपाळी कर्तव्यावर फडगेट बीट मार्शलवरील कर्मचारी पो.शि. ७७२४ पवार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना रस्त्याचे कडेला एक कॅरीबॅग त्यांना मिळून आली. नमुद कर्मचारी यांनी कॅरीबॅगची पाहणी केली असता, त्यामध्ये इसम नामे महादेव पाटील वय ४३ वर्षे रा. सोलापुर यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड व बँक पासबुक व ॲक्सीस बँकेचे चेकबुक व इतर महत्वाची कागदपत्रे होती. नमुद कर्मचारी यांनी सदरचे कागदपत्रे फडगेट बीट मार्शलवरील डयुटी अंमलदार पो.हवा. ५५६९ क्षीरसागर यांचे ताब्यात दिले. नमुद पोलीस कर्मचारी पोलीस हवा. क्षीरसागर, पोलीस शिपाई पवार यांनीसदर कागदपत्रांमधील प्राप्त मोबाईल क्रमांकवार फोन करुन संपर्क साधला असता, कॅरीबॅग गहाळ झालेली व्यक्ती महादेव पाटील हे मिळुन आले त्यांचेकडे सदर कागदपत्रांबाबत चौकशी करता त्यांनी सदरची कागदपत्रे आपलीच असल्याचे सांगीतले. सदर व्यक्ती फडगेट पोलीस चौकी या ठिकाणी आली असता, त्यांना त्यांची हरविलेली मुळ कागदपत्रे ताब्यात देण्यात आलेली आहेत.

